**पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा - २००६.**
**प्रवेशप्रमाणपत्रे निर्गमित केल्याबाबतचे घोषणापत्र**

महाराष्ट्र शासन
गृह विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक -पीएसबी-०३०५/प्र.क्र.२००/पोल-५(अ),
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक १६ जुलै, २००८.

वाचा :-१) शासन परिपत्रक, गृह विभाग, क्रमांक-पीएसबी-०३०५/प्र.क्र.२००/पोल-५(अ), दिनांक १ जुलै, २००८
२) महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे पत्र क्र.१४४२(२)/मांवप/२००६/१२, दि.१६/७/२००८.

**शासन परिपत्रक** :- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील **पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्तीसाठी मर्यादित विभागीय स्पर्धा (पूर्व) परीक्षा-२००६ दि.११ मे, २००८ रोजी घेण्यात आली होती.** त्यामध्ये अर्हताकारी ठरलेल्या उमेदवारांची मुख्य परीक्षा दि.२० जुलै, २००८ रोजी घेण्यात येणार आहे. यासंबंधी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि.१४ जुलै, २००८ रोजी प्रवेशप्रमाणपत्रे निर्गमित करण्याबाबत खालीलप्रमाणे घोषणा केलेली आहे:-

"पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा-२००६ ही **दिनांक २०/७/०८ रोजी औरंगाबाद, मुंबई, पुणे व नागपूर केंद्रांवर घेण्यात येणार आहे.** दिनांक ११ मे, २००८ रोजी घेण्यात आलेल्या पूर्व परीक्षेमध्ये अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेकरिता पात्रता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरता प्रवेश देण्यात आला असून त्यानुसार त्यांना प्रवेशप्रमाणपत्रे भारतीय टपाल खात्यामार्फत रवाना करण्यात आलेली आहेत. पूर्व परीक्षेसाठी मुंबई, औरंगाबाद, पुणे व नागपूर केंद्र घेतलेल्या उमेदवारांना त्या त्या केंद्रावर प्रवेश देण्यात आला आहे. तसेच अमरावती केंद्र घेतलेल्या उमेदवारांना नागपूर केंद्रावर, नांदेड केंद्र घेतलेल्या उमेदवारांना औरंगाबाद केंद्रावर व नाशिक केंद्र घेतलेल्या उमेदवारांना मुंबई केंद्रावर प्रवेश देण्यात आलेला आहे.

मुख्य परीक्षेकरिता प्रवेश दिलेल्या ज्या उमेदवारांना **दिनांक १७/७/०८ पर्यंत प्रवेशप्रमाणपत्रे प्राप्त होणार नाहीत, अशा उमेदवारांनी दिनांक १८ व १९ जुलै, २००८ रोजी मुंबई केंद्राच्या बाबतीत आयोगाच्या माझगांव येथील कार्यालयात आणि औरंगाबाद, नागपूर व पुणे केंद्रांच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयात व्यक्तीश: संपर्क साधून प्रवेशप्रमाणपत्राची दुय्यम प्रत प्राप्त करुन घ्यावी.** प्रवेश दिलेल्या उमेदवारांच्या यादीत नाव असल्यासच अशा उमेदवारांना प्रवेशप्रमाणपत्राची दुय्यम प्रत पुरविण्यात येईल. परीक्षा प्रवेशाबाबत उमेदवारांना काही अडचण उद्भवल्यास त्यांनी आयोगाच्या माझगांव कार्यालयाशी परीक्षेपूर्वीच संपर्क साधावा. परीक्षेनंतर या संदर्भात आलेल्या तक्रारीची दखल आयोगाकडून घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.